पुणे जिल्हा परिषद ,पुणे
आरोग्य विभाग
जिल्हा निवड समिती , पुणे
जिल्हा परिषद पुणे अंतर्गत आरोग्य विभागाकडील ५ संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी जाहिरात सन २०१९

**जाहिरात क्र. ०२/ २०१९**

मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद,पुणे याच्या आस्थापनेवरील आरोग्य विभागाकडील ५ सवंर्गातील खालील प्रमाणे रिक्त पदे भरण्याकरीता सामाजिक व आर्थिक दृष्टया (एसईबीसी) मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ झालेल्या समांतर आरक्षणानुसार पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत तसेच दिव्यांगाच्या प्रकारात बदल झालेल्या प्रकारानुसार ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणेची सुविधा www.maharddzp.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**पदभरतीसाठी संवर्ग निहाय घोषित पदे**

| अ.क्र. | पदाचे नाव | दिव्यांगाचे बदल झालेल्या प्रकारानुसार एकूण राखीव |
|---|---|---|
| १ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी | ५ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) ४०% | ४ |
| ३ | आरोग्य सेवक (महिला) | १३ |
| ४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ० |
| ५ | औषध निर्माता | ० |

| अ.क्र. | पदाचे नाव | सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ झालेल्या समांतर आरक्षणानुसार एकूण पद संख्या |
|---|---|---|
| १ | औषध निर्माता | २ |
| २ | आरोग्य सेवक (पुरुष) ५०% हंगामी फवारणी | १ |

**ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याचे वेळापत्रक**

| | | |
|---|---|---|
| १ | नव्याने समाविष्ठ दिव्यांग तसेच नव्याने वाढलेल्या खुल्या प्रवर्गातील रिक्त जागांसाठी उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविणे | दिनांक १ सप्टेंबर २०२१ ते २१ सप्टेंबर २०२१ |
| २ | १.सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास (एसईबीसी) प्रवर्गातून अर्ज सादर केलेल्या उमेदवाराने आर्थिक दृष्टया दुर्बल प्रवर्गाबाबत (ईडब्ल्यू एस) अथवा खुल्या प्रवर्गाबाबत विकल्प देणे.<br>२.उमेदवाराने कोणत्याही एका जिल्हा परिषदेचा विकल्प देणे<br>३.दिव्यांग प्रवर्गातून पूर्वी अर्ज सादर केलेल्या उमेदवारांना विकल्प व परिक्षा शुल्क सादर करावयाचा कालावधी | दिनांक १ सप्टेंबर २०२१ ते १४ सप्टेंबर २०२१ |

पदभरती करीता दिनांक ६/३/२०१९ ची सविस्तर जाहिरात, दिनांक १४/६/२०२१ व २०/८/२०२१ च्या शासन निर्णयाप्रमाणे सामाजिक व आर्थिक दृष्टया मागास प्रवर्गाचे आरक्षण रद्द झाल्याने खुल्या प्रवर्गातील वाढ होणा-या समांतर आरक्षणाच्या प्रवर्गासाठी पद भरतीची सविस्तर जाहिरात तसेच दिव्यांगांच्या प्रकारात बदल झाल्याप्रमाणे सविस्तर जाहिरात , जाहिर प्रकटन व शासनाचे दिनांक 20/8/2021 चे शुध्दीपत्रक ,www.punezp.mkcl.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज सादर करण्यापूर्वी तसेच विकल्प सादर

करण्यापूर्वी उमेदवारांनी शासन निर्णय , सविस्तर जाहिरात व जाहिर प्रकटनामध्ये दिलेल्या सर्व सूचनांचे काळजीपूर्वक वाचन करुन अर्ज / विकल्प सादर करावेत.

भरतीप्रकिया /परिक्षा स्थगित करणे किंवा रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकूण अथवा संवर्ग निहाय पदसंख्येमध्ये वाढ किंवा घट करण्याचे अधिकार अध्यक्ष जिल्हा निवड समिती तथा जिल्हाधिकारी , पुणे तसेच नियुक्ती प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद पुणे यांना राहतील. याबाबत उमेदवारांना कोणताही दावा सांगता येणार नाही किंवा वाद उपस्थित करता येणार नाही.

ठिकाण - पुणे
दिनांक- २६/०८/२०२१

सदस्य सचिव
तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी,
पुणे जिल्हा परिषद, पुणे

सदस्य
तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
पुणे जिल्हा परिषद, पुणे

सदस्य
तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
पुणे जिल्हा परिषद, पुणे

अध्यक्ष, जिल्हा निवड समिती
तथा
जिल्हाधिकारी , पुणे